अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुते ।

# ज्ञान प्रबोधिनी

घडो ज्ञानाचा उद्‌बोध । भक्तिप्रेमाचा कल्लोळ ।

## मासिक वृत्त

सौर अग्रहायण १९३३ चे वृत्त

**सौर पौष १, शके १९३३ दि. २२/१२/२०११**

दृष्टिक्षेपात **ज्ञान प्रबोधिनी**

**विस्तार केंद्र, बोरीवली :**

- **शाळा व महाविद्यालय :** साप्ताहिक विकसिका, 'उमलू सर्वांगाने', हिवाळी व उन्हाळी शिबिरे, विद्याव्रत संस्कार शिबिर, युवक गट, बोरीवली प्रचिती गट, शिक्षक कार्यशाळा, पालक कार्यशाळा
- **महिला :** संवादिनी– 'साद' भित्तीपत्रक, पालवी, संस्था भेट 'उमलत्या वयाशी जुळवून घेताना...'
- सर्वांसाठी मातृभूमीपूजन, पर्यावरण गट, कृतिशील गट, अभंग निरूपण कार्यक्रम, प्रबोधिनी गीत गंधार

## शिक्षण प्रभाग

### ज्ञान प्रबोधिनी, प्रशाला

इ. ८वी च्या मुलांचा सौर अग्रहायण ६ ते १० व मुलींचा सौर अग्रहायण ८ ते १२ या कालावधीत कोकण अभ्यासदौरा झाला. यामध्ये चाफळ, कोयनानगर, संगमेश्वर, पावस, सुरुबन, पतितपावन मंदिर, टिळकांचे जन्मस्थान रत्नागिरी, भगवती किल्ला, काळासमुद्र, थिबा राजवाडा, पानवळ पूल, पावसमध्ये आकाशदर्शन, पूर्णगड, गणेश कुळे, देसाई बंधू फळ प्रक्रिया केंद्र, फिनोलेक्स उर्जा प्रकल्प, जहाज बघणे, मालगुंड येथील केशवसूत स्मारक, प्राचीन कोकण इत्यादी ठिकाणी भेटी दिल्या.

प्रशालेचा माजी विद्यार्थी श्री. कुलदीप वर्मा याचे इ. ९वी च्या वर्गावर व्याख्यान झाले. Gasification of Coal या विषयात त्याने नुकतेच पेटंट मिळविले आहे. या प्रक्रियेचे सविस्तर स्पष्टीकरण त्याने या व्याख्यानात दिले.

सौर अग्रहायण १२ रोजी डॉ. ग. बा. कोल्हटकर यांचे इ. ६वी मुलांसमोर 'ध्वनी प्रदूषणाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये सक्रियता' या विषयावर व्याख्यान झाले.

राष्ट्रीय बालवैज्ञानिक परिषदेमध्ये इ. ९वी च्या मुलींचा गट राष्ट्रीय पातळीवर निवडला गेला. 'Soil versus detergent' ह्या विषयावर कु. विदुला कुलकर्णी, कु. सानिका चंद्रचुड, कु. इरावती आनंद. कु. तेजस्वीनी राणे या मुलींनी प्रकल्प केला.

### शैक्षणिक उपक्रम संशोधिका

निरीक्षण कौशल्ये या व्याख्यानमालेअंतर्गत सौर अग्रहायण ९ रोजी प्रा. प्र. के. घाणेकर यांचे 'फुलांचे निरीक्षण' या विषयावर व्याख्यान झाले. पुणे शहरातील नऊ माध्यमिक शाळांतून आलेल्या ७३ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. तसेच सौर अग्रहायण २३ रोजी डॉ. राजेंद्र देवपूरकर यांचे 'सूक्ष्म जीवांचे निरीक्षण' या विषयावर व्याख्यान झाले. एकूण आठ माध्यमिक शाळांतून ७० विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

सौर अग्रहायण ८ ते १७ या कालावधीत श्री. विवेकराव पोंक्षे यांचा ईशान्य भारतात प्रवास झाला. या संपर्क अभियानातून त्यांनी मणिपूर राज्यातील अशांत परिस्थितीचा प्रत्यक्ष अभ्यास केला. उखरूल व तामेंगलौंग या दोन जिल्ह्यातील पूर्वांचल विकास प्रतिष्ठानच्या शैक्षणिक कार्यास त्यांनी भेट दिली.

### स्पर्धा परीक्षा केंद्र

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या पूर्वपरीक्षा तुकडी २ साठी मुलाखतीद्वारे निवडप्रक्रिया पूर्ण झाली. सौर अग्रहायण १० रोजी नवीन वर्गाचे अध्यापन सुरू झाले.

दोन्ही वर्गांकडे प्रा. सविताताई कुलकर्णी यांनी प्रश्नपत्रिका विश्लेषण व अभ्यासपद्धती याविषयी व्याख्याने घेतली.

**मुलाखत प्रशिक्षण वर्ग - प्रेरणा :** सौर अग्रहायण ६ ला मुलाखत प्रशिक्षण वर्ग सुरू झाला. यामध्ये ८५ विद्यार्थी मार्गदर्शन घेत आहेत. या वर्गाला How to prepare याविषयी श्री. संदीप साळुंके (उपायुक्त, आयकर), श्री रवि पाटील (Cybercrime expert) व डॉ. विवेक कुलकर्णी यांनी व्याख्याने व प्रात्यक्षिक घेतले.

★ **विशेष सूचना** पुढील महिन्यापासून मासिक वृत्तामध्ये सौर दिनांकांचाच वापर करावा. ★

गटमुलाखती व गटशः वादविवाद याविषयी प्रा. सविताताई कुलकर्णी तसेच सध्या आजूबाजूला घडणाऱ्या काही घटनांचे विश्लेषण करणारे व्याख्यान श्री. अजितराव कानिटकर यांनी दिले. श्री. रविंद्र खरे यांची मुलाखतीसाठी आवाजातील चढ-उतार, व्यक्तिमत्त्व कसे असावे याविषयी प्रात्यक्षिकासह कार्यशाळा झाली. महत्त्वपूर्ण विषयाच्या चार TED films विद्यार्थ्यांनी पाहिल्या व त्यावर गटचर्चा झाल्या. त्याविषयी नचिकेत नित्सुरे यांनी विश्लेषणपर मार्गदर्शन केले.

बेळगावमध्ये देवदासी प्रथा निर्मूलनाचे काम करणारे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. भीमराव गस्ती यांचे अनुभव कथन व मार्गदर्शन सर्व अभ्यासिका सदस्य व नियमित वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी झाले.

## नवनगर विद्यालय, निगडी

**पूर्व प्राथमिक विभाग :** आगामी शैक्षणिक वर्षासाठी पाल्यांचा प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या पालकांसाठी पहिल्या कार्यशाळेचे सौर अग्रहायण १७ रोजी आयोजन करण्यात आले होते. श्री. गिरीशराव कुलकर्णी यांनी 'सुजाण पालकत्व' या विषयावर पालकांना मार्गदर्शन केले. एकूण ६०० पालक या कार्यशाळेला उपस्थित होते. मुलांना त्यांच्या आंतरउर्मीने फुलू द्या, अनुभवाच्या अनेक संधी द्या. हा संदेश त्यांनी दिला.

**गुरुकुल विभाग :** या महिन्यात गुरुकुलातील विद्यार्थ्यांची 'मातृभूमी परिचय शिबिरे' जाऊन आली. इ. ६वी - धाऊलवाडी (रत्नागिरी), इ. ७वी - जळगाव, इ. ९वी अंदमान व इ. १०वी गुजरात तसेच इ. ८वी चे विद्यार्थी कार्यकर्ते म्हणून इ. ६वी, ७वी च्या शिबिरात सहभागी होते.

**माध्यमिक विभाग :** इ. ८वी व ९वी च्या विद्यार्थ्यांचे निवासी शिबिर सौर अग्रहायण १७ ते १९ या कालावधीत झाले. ज्येष्ठ समाजसेवक आण्णा हजारे यांची तासभराची मुलाखत, त्यांच्यामुळे राळेगणसिद्धीचा झालेला विकास, पोपटराव पवार यांची भेट आणि विद्याव्रताची व्याख्याने झाली.

सौर कार्तिक १० ते २१ या कालावधीत विभागातील अध्यापकांची कर्नाटक राज्यात शैक्षणिक सहल जाऊन आली. कर्नाटकातील मंदिरांचे दर्शन, समुद्र किनारा, मैत्रेयी गुरूकुलाची भेट, शारदामांदिर मंगळूरची भेट व कर्नाटक राज्यातील संस्कृती अभ्यासता आली.

**क्रीडाकुल :** बंगळूर येथील योगासन स्पर्धेत कु. वैष्णवी आंद्रे व कु. साक्षी महाले यांना सुवर्णपदक मिळाले.

**निगडी केंद्र :** सिंधुनगर युवा संघर्ष समिती व शिवसह्याद्री प्रतिष्ठापनचा पहिला 'प्राधिकरण भूषण पुरस्कार' श्री. वामनराव अभ्यंकर यांना ज्येष्ठ साहित्यिक डॉ. विजया वाड व डॉ. विश्वास मेहेंदळे यांच्या हस्ते सौर अग्रहायण १३ रोजी प्रदान करण्यात आला.

## ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे

सौर अग्रहायण १ रोजी मावळ तालुका माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघातर्फे मा. व्यंकटराव भताने व चोळकर मॅडम यांचा सत्कार करण्यात आला.

सौर अग्रहायण १७ ते १९ रोजी हिवाळी शिबिर गोवित्री येथे झाले. यामध्ये विद्यालयाचे १५० विद्यार्थी व परिसरातील ६५ विद्यार्थी सहभागी झाले होते. तीन दिवसात आदर्श शेती, पशुपालन, गोबरगॅस याची माहिती घेतली तसेच महाशब्दे यांच्या प्रकल्पाची माहिती घेतली.

ज्ञान प्रबोधिनी, निगडी येथील माजी विद्यार्थी आलेकर यांनी ध्यान व योगासने संदर्भात विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. ग्रामस्वच्छतेबद्दल जनजागृती करण्यासाठी विद्यार्थ्यांनी गावात स्वच्छता केली. तसेच स्वच्छतेचे महत्त्व तेथील गावकरी व विद्यार्थी यांना सांगितले.

## ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर

**माध्यमिक :** सौर कार्तिक २७ रोजी गोंदिया येथे झालेल्या शालेय राज्यस्तरीय स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलींच्या गटात कु. रक्षा गोरटे हिने प्रथम क्रमांक मिळवला.

सौर अग्रहायण४ रोजी इ. ८वी साठी विद्याव्रत व्याख्यानास सुरूवात झाली. त्या अंतर्गत विद्याव्रत संकल्पना या विषयावर मा. प्रशांत दिवेकर यांनी व्याख्यान दिले. सौर अग्रहायण १४ रोजी 'शारीरिक विकसन' या विषयावर मा. स्नेहलताई पेंडसे यांनी व्याख्यान दिले.

सौर अग्रहायण १६ व १७ रोजी मा. संचालकांच्या वार्षिक भेटीचे नियोजन केले होते. यावेळी इ. ९वी व १०वीच्या विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. यात इ. १०वी च्या विद्यार्थ्यांनी वर्षभरात त्यांना मिळालेल्या स्वयंअध्ययन कौशल्याच्या मार्गदर्शनाचा अभ्यास करताना कशाप्रकारे उपयोग केला या विषयी मा. संचालकांसमोर निवेदन केले. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध विषयांचे

वेगवेगळ्या प्रकारचे तक्ते व धारिण्या मांडल्या होत्या. मा. संचालकांनी विद्यार्थ्यांना तक्त्यांची पुनर्रचना, माहितीची पुनर्मांडणी या विषयी मार्गदर्शन केले.

इ. ९वी च्या विद्यार्थ्यांनी कुसुमाग्रजांच्या कवितांचा अभ्यास करुन वर्गसंकल्पावर आधारित छोटे स्नेहसंमेलन आयोजित केले. यात नाटक, काव्यवाचन, नृत्य, समूहगीत सादर केले.

**शिशु अध्यापिका विद्यालय :** सौर कार्तिक २६ रोजी शिशु-अध्यापिका विद्यालयाला संचालक भेट झाली. या निमित्ताने विविध ठिकाणी, विविध प्रकारचे काम करणाऱ्या सहा माजी विद्यार्थिनींची भावपूर्ण व आशयसंपन्न निवेदने झाली. मा. संचालकांनी आपल्या मार्गदर्शनात आपले मूल उत्तम माणूस म्हणून कसे असावे, याविषयी मार्गदर्शन केले.

सौर अग्रहायण १२ते १४ या कालावधीत हराळी येथे प्राथमिकच्या विद्यार्थ्यांचे शिबिर घेण्यात आले. या शिबिरासाठी २२ विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. अभिनय गीते, विज्ञान प्रयोग, हस्तव्यवसाय, शिवणकाम, चित्रकला, जीवनव्यवहार, मातीकाम इ. विषय शिकवण्यात आले.

## ज्ञान प्रबोधिनी, हराळी

युवक गटाच्या पुढाकाराने सौर अग्रहायण २० रोजी हराळी गावातील बचत गटाच्या प्रमुखांची बैठक झाली. बचत गट सक्षमपणे कसे चालवावेत याविषयी सौ. उज्वलाताई, सौ. सुमनताई आणि सौ. बागेश्रीताई यांचे मार्गदर्शन व अनुभव कथन झाले.

युवक गटाच्या पुढाकाराने आणि त्यांच्या प्रयत्नामुळे हराळी गावात सौर अग्रहायण २१ रोजी महिलांची ग्रामसभा झाली. हराळी गावात प्रथमच ग्रामसभेला १०० महिला एकत्र आल्या. यामध्ये वेल्हे परिसरातील सौ. उज्वलाताई आणि सौ. सुमनताई या महिला सरपंचाचे व सौ. बागेश्रीताई पोंक्षे यांचे अनुभवकथन झाले. विशेष म्हणजे महिलांची ग्रामसभा पहायला गावातील १०० पुरुष आले होते.

सौर अग्रहायण २१ रोजी शाळा व कृषी विद्यालयातील विद्यार्थी यांच्यासमोर सौ. बागेश्रीताई यांचे 'मला भेटलेली माणसे आणि त्यातून झालेले शिक्षण' या विषयावर अनुभवकथन झाले.

श्री. दत्तप्रभाकर गोखले यांनी दिलेल्या देणगीतून तयार केलेल्या क्रीडांगणाचे सौर अग्रहायण २३ रोजी श्री. व सौ. गोखले यांच्या हस्ते नामकरण करण्यात आले. श्री. गोखले यांचा नातू चि. सचिन गोखले याचे नाव क्रीडांगणाला देण्यात आले. क्रीडाकुल निगडीचे श्री. भगवानराव सोनवणे यांनी हे क्रीडांगण तयार करण्यासाठी खूप मोलाची मदत केली आहे.

पुणे प्रशालेतील इ. १०वीच्या विद्यार्थिनी आणि हराळी प्रशालेच्या विद्यार्थिनी यांच्यामध्ये पत्र सेतू हा नवीन उपक्रम सुरू करण्यात आला आहे. पुण्यातून आलेल्या पत्रांना हराळीतून विद्यार्थिनींनी अतिशय उत्साहात पत्रोत्तरे लिहिले.

सौर अग्रहायण २५ रोजी मा. आण्णा, मा. लताताई, श्री. चंद्रकांत पाटील व श्री. अभिजीत एकंबीकर यांनी रांजणी (जि. उस्मानाबाद) येथील Natural Sugar & Allied Industries या बहुधीश प्रकल्पाला भेट दिली. श्री. भैरवनाथजी ठोंबरे यांनी उभारलेल्या या प्रकल्पामध्ये साखर कारखाना, Alloy Industry Distillary. वीज निर्मिती, दूध प्रकल्प, इंग्रजी माध्यमाची शाळा, BCA & BCS महाविद्यालय, पतपेढी इ. विभाग चालतात. नवनवीन प्रयोग, व्यावसायिकता आणि सामाजिक भान यांचा सुरेख मिलाप येथे पाहायला मिळाला.

---

# संघटन प्रभाग

---

## युवक विभाग

सौर अग्रहायण १२ व १३ या दोन दिवसात कोळवडी, कातवडी व मांगदरी (ता. भोर, जि. पुणे) या तीन गावांमधील इ. ७वी व ८वी मुलांसाठी विस्तार शिबिराचे आयोजन करण्यात आले. ७-८ मार्गदर्शकांनी दोन दिवसात विविध वेळांमध्ये या शिबिराची जबाबदारी सांभाळली. सुमारे २५ विद्यार्थ्यांचा गट या शिबिरात सहभागी झाला होता.

सौर अग्रहायण १६ ते १९ या कालावधीत इ. ८वी, ९वी च्या ४० विद्यार्थ्यांचे विज्ञान प्रकल्प शिबिर श्री. नचिकेत नित्सुरे याने घेतले. विद्यार्थ्यांकडून छोटे प्रकल्प करून घेतले गेले.

## युवती विभाग

सौर अग्रहायण १९ व २० रोजी सोलापूर येथे झालेल्या २५ जणींच्या अग्रणी प्रशिक्षण शिबिरात संयोगिता दाते हिने प्रशिक्षक म्हणून सहभाग घेतला.

तिळगूळ विक्रीचे काम सुरू झाले असून यावर्षी १५०० किलो विक्रीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यातील तिळगुळाच्या पॅकींगला सौर अग्रहायण २९ रोजी सुरुवात झाली. विक्रीचे उद्दिष्ट मागील वर्षी पेक्षा ४०० किलो जास्त असून सर्व उपक्रमात जास्तीत जास्त प्रमाणात पथक पद्धतीचा वापर केला जाईल. यावर्षी मऊ लाडूंची नव्याने भर पडली असून भेट देण्यासाठी आकर्षक पॅकिंगमध्ये तिळगुळ उपलब्ध असेल.

## छात्र प्रबोधन

'गंमत मोठ्ठ होण्यातली' हे कृतीपुस्तक छात्र प्रबोधनतर्फे प्रकाशित झाले. या पुस्तकाचे लेखन सौ. उमा बापट यांनी केले आहे. हे कृती पुस्तक पालकांसाठी विशेष उपयुक्त आहे.

छात्र प्रबोधनतर्फे ग्रामीण दिवाळी अंकावर आधारित २० ग्रामीण मेळावे घेण्याचे ठरविले होते त्यांची सुरुवात झाली आहे. आत्तापर्यंत सहा ठिकाणी ग्रामीण मेळावे झाले.

## स्त्री शक्ती प्रबोधन

**कार्यशाळा :** 'उमलत्या वयाशी....' गटाने अनुक्रमे १) सौर अग्रहायण १ व २ रोजी विधी महाविद्यालय (शिवाजी मराठा सोसायटी) येथे 'तारुण्याच्या उंबरठ्यावर' ही कार्यशाळा, २) सौर अग्रहायण २ व ३ रोजी प्रेरणा माध्यमिक विद्यालय (आंबेगाव) येथे इ. ९वी च्या मुलांसाठी कार्यशाळा, ३)सौर अग्रहायण ८ व ९ रोजी फर्ग्युसन महाविद्यालयात 'तरुणाईची आव्हाने' ही दोन दिवसीय कार्यशाळा घेतली. मंचर येथे सौर अग्रहायण १७ रोजी इ. ११ व १२ वी साठी एक दिवसीय कार्यशाळा घेतली.

## राष्ट्रीय एकात्मता

**नागरी वस्ती अभ्यास गट :** अभ्यासगट कार्यकर्त्यांच्या काशीवाडी, मातंगवस्ती, रमाबाई आंबेडकरनगर वस्ती आणि इंदिरानगर वस्ती या वस्त्यांना हर्षाताईंबरोबर भेटी झाल्या. या वस्त्यांमध्ये फिरून आणि लोकांशी बोलून वस्ती समजून घेणे असा या भेटीचा उद्देश होता.
**युवती मंडळे :** या महिन्यात वडारवाडी आणि काशीवाडी या दोन वस्त्यांमध्ये युवती आणि महिलांसाठी युवती मंडळ सुरू झाले. पेपर बॅग्स्, फुले, ज्वेलरी, मेहंदी अशा कला आणि हस्तकौशल्यांचे प्रकार यात युवतींना शिकवले.

## विस्तार केंद्र

### बोरीवली विस्तार केंद्र :

**नियमित उपक्रम : शिबिर गट :** सौर कार्तिक २५ ते २९ मध्ये आनंदराव पवार सरस्वती विद्यामंदिर येथे इ. ४थीच्या मुलांसाठी 'इंद्रधनू' शिबिर घेण्यात आले. एकूण ३८ मुले शिबिराला उपस्थित होती.

प्रचीतीगटासाठी सौर अग्रहायण १९ रोजी वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी अभ्यास कसा करावा यावर अतुल दादांनी मार्गदर्शन केले.

**प्रासंगिक उपक्रम :** सौर कार्तिक २९ रोजी बोरीवलीला मा. संचालकांची भेट झाली. कुमार वयोगटातील विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी मा. संचालकांचे ''उपेक्षू नको गुणवंता अनंता'' या विषयावर व्याख्यान व चर्चा झाली. एकूण ५० पालक उपस्थित होते. अतिशय योग्य संदेश देणारा व पालकांच्या हृदयाला भिडणारा उपदेश यातून मिळाला.

सौर कार्तिक ३० रोजी आदिवासी सेवा मंडळ, बोरीवली (पूर्व) येथे आदिवासी मुलींच्या वसतीगृहात बालदिनानिमित्त मातृभूमीपूजनाचा सोहळा झाला. एकूण २५ मुली व शीतलताई, अर्चनाताई, स्मिताताई व गीताताई उपस्थित होत्या. यावर्षी या संस्थेचे मातृभूमीपूजनाचे तिसरे वर्ष होते.

### डोंबिवली विस्तार केंद्र :

**प्रबोधक मंडळ :** लचित बडफुकन या गटात छात्रप्रबोधन मासिकाच्या दिवाळी अंकातील 'संवाद'चे वाचन आणि मग दिवाळी अंकावर चर्चा झाली. 'सृजनाला पंख नवे' या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सर्व मुलांना छात्र प्रबोधनचे अंक वाटले आणि स्पर्धेच्या नियोजनाची चर्चा झाली.

**विद्याव्रत पाठपुरावा :** सौर अग्रहायण ६ रोजी विद्याव्रत पाठपुराव्यात साहस सायकल सहलीचा उपक्रम गंधार कुलकर्णी, सुमेध फाटक व आदित्य जोशी यांनी घेतला. यात ११ विद्याव्रतींनी सहभाग घेतला होता. पालक मंडळाचे श्री मुणगेकर काका देखील आपले

डोंबिवली ते मुंबई सायकल दौऱ्याचे अनुभव सांगायला मुलांबरोबर सायकल वर सहभागी झाले होते.

सौर अग्रहायण १९ रोजी रात्रशिबिर घेतले. चंद्रग्रहण होते त्यामुळे आकाशदर्शनाचा कार्यक्रम झाला. आकाशप्रेमी श्री. अमित कदम यांनी दुर्बिणीच्या साहाय्याने गुरु, शनि व इतर नक्षत्र यांचे दर्शन घडवले.

सौर कार्तिक २९ रोजी आहार तज्ज्ञ शर्वरी कलन्त्रे यांचे 'वाढीच्या वयातील मुलांचा आहार' या विषयावर व्याख्यान झाले. २५ पालक उपस्थित होते.

**समतोल :** संवादिनीच्या 'समतोल' या द्वैमासिकाचा डिसेंबर महिन्याचा अंक काढण्याची जबाबदारी 'डोंबिवली' केंद्राने घेतली होती. 'पालकत्वाचे' अनेक आयाम ह्या अंकात चर्चिले आहेत. अतिथी कार्यकारी संपादक म्हणून डोंबिवलीच्या अश्विनीताई मयेकर यांनी काम पाहिले. वैशाली वैशंपायन यांनी 'पालकांच्या वागण्या-बोलण्यातील विसंगती' दर्शविणारे दोन प्रसंग संवाद रूपात लिहिले.

---

## संशोधन प्रभाग

---

### प्रज्ञा मानस संशोधिका

I AM तर्फे 'हटके करियर' ही व्याख्यानमाला झाली. त्यात पुरातत्वशास्त्र, उद्योजकता, BPO and Call Centre, Medical Representative, Vocational Courses ह्या विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

'अभ्युदय' प्रकल्पातील (रोटरीच्या मदतीने चालणाऱ्या) शिक्षकांसाठी सौर कार्तिक २९ व ३० ला प्रशिक्षण सत्र झाले. त्यात अध्यापकांचे प्रकल्प, भावनांचे व्यवस्थापन हे विषय घेण्यात आले.

भारतीय जैन संघटनेच्या मूल्यवर्धन प्रकल्पातील शिक्षक प्रशिक्षणात सौर अग्रहायण १४ व १५ रोजी 'विवेकी विचार' आणि सौर अग्रहायण २१ व २२ रोजी 'भाषिक क्षमता' हे विषय घेतले.

'आनंदाची शोधयात्रा' ही विवेकनिष्ठ विचारपद्धतीवरील कार्यशाळा सौर कार्तिक २६ ते अग्रहायण २६ या काळात झाली. ३२ जणांनी यात सहभाग घेतला.

जॉन डिअर कंपनीच्या कर्मचाऱ्यांसाठी प्रतिभा आणि ताणतणाव या विषयांवरील वर्ग झाले.

सौर अग्रहायण १८ ला मा. अनघाताई लवळेकर यांचे नगर येथे ज्ञानसंपदा व्याख्यानमालेत 'डोळे उघडून बघा गड्यांनो...' ह्या विषयावर व्याख्यान झाले. सुमारे ३५० श्रोते उपस्थित होते.

### संत्रिका

सौर अग्रहायण २० रोजी जनतंत्र उद्‌बोधन मंचातर्फे डॉ. असगर अली इंजिनिअर यांचे 'सांप्रदायिक हिंसाचार प्रतिबंधक विधेयक' (Communal Violence Bill 2011) वर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. व्याख्यानानंतर 'राजकारण विरहीत हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रयत्न' या विषयावर चर्चासत्र झाले. यामध्ये ज्ञान प्रबोधिनीचे प्रतिनिधी तसेच पूना कॉलेज आझम कॅम्पस, मुस्लिम सत्यशोधक मंडळ, असीम फाऊंडेशन चे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

ग्रामविकसन विभागासह संयुक्त उपक्रम म्हणून मार्गशीर्ष महिन्यातील गुरुवारच्या वैभव लक्ष्मीपूजनाच्या सामूहिक कार्यक्रमाचे आयोजन सौर १७, २४ अग्रहायण व १ पौष रोजी आयोजित करण्यात आले. संत्रिकेच्या पुरोहिता आणि वर्गातील महिला सदस्या यांनी या पूजेचे पौरोहित्य केले.

चित्पावन प्रतिष्ठान तर्फे २०१२ सालच्या दिनदर्शिकेसाठी - ज्ञान प्रबोधिनी पद्धतीचा विवाह संस्कार या आशयाचा लेख मागविण्यात आला. आर्या जोशी यांनी तो लिहून पाठविला आहे.

डोंबिवली विस्तार केंद्रातर्फे पौरोहित्य शिकू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी सौर अग्रहायण २६ रोजी आर्या जोशी यांनी बैठक घेऊन सर्व माहिती सांगितली. सौर अग्रहायण २७ रोजी तेथील पौरोहित्य गटाचा सराव वर्गही त्यांनी घेतला.

---

◊ 'संत्रिका' विभाग व 'छात्र प्रबोधन' यांच्या सहकार्याने ज्ञान प्रबोधिनीची 'राष्ट्रीय सौर/चांद्र/ग्रेगोरियन दिन दर्शिका प्रसिद्ध झाली.
संपर्क : छात्र प्रबोधन

**पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम :** राज्य शासनाच्या वसुंधरा पाणलोट प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत गावपातळीवरील प्रशिक्षणासाठी यशदातर्फे ज्ञान प्रबोधिनी संस्थेची निवड करण्यात आली आहे. पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील एकूण १४ गावांमध्ये गावपातळीवर पाणी समिती सदस्य व अन्य ग्रामस्थांचे पाणलोट विषयक प्रशिक्षण घेणे यात अपेक्षित आहे.

**सौर ऊर्जा प्रकल्प :** यवतमाळ जिल्ह्यातील ६६ तर बस्तर (छत्तीसगड) परिसरातील दंतेवाडा जिल्ह्यात १५ आदिवासी कुटुंबांना सौर दिव्यांचे वाटप करण्यात आले. यात ५०% रक्कम कुटुंबानी भरली तर उर्वरित ५०% रक्कमेची जबाबदारी पुण्यातील कृतज्ञता ट्रस्टने स्वीकारली.

**संस्था सक्षमीकरण :** यवतमाळ येथील चेतना समाजसेवा मंडळ व अहमदपूर (जि. लातूर) येथील परिवर्तन संस्थेस वन व पर्यावरण मंत्रालयाच्या पर्यावरण जागृती संदर्भात प्रकल्प प्रस्ताव बनविण्यास मदत करण्यात आली होती. या दोन्ही प्रस्तावास प्रत्येकी रु. ७,०००/- चे अनुदान पर्यावरण मंत्रालयातर्फे मंजूर करण्यात आले आहे.

**स्त्री शक्ती प्रबोधन :** वेल्हे कुपोषण मुक्त तालुका अभियानांतर्गत आंबवणे येथे १७ गावातील ५५३ जणांना (० ते ६ वयोगट) लसीकरण केले. त्यासाठी रोटरी क्लब यांनी व्यवस्था बघितली तर कल्याण ट्रस्टच्या डॉक्टरांनी लसीकरण केले. यात अंगणवाडीताईंनी मुले पालकांसह येतील असे पाहिले. या कार्यक्रमासाठी L & T Infotech येथून १८ स्वयंसेवक आले होते. या कार्यक्रमाचे पूर्ण संयोजन आपण केले होते.

**किशोरी विकास प्रकल्पांतर्गत** सौर कार्तिक २९ रोजी रामकृष्ण मोरे महाविद्यालय येथे, सौर अग्रहायण १ रोजी मनजाई-आसनी येथे (न्यू इंग्लिश स्कूल), सौर अग्रहायण १० रोजी दापोडे येथे, सौर अग्रहायण १२ रोजी सोंडे माथणा येथे कार्यशाळा झाल्या.

निगडी येथील ३५ अग्रणी-प्राग्रणींनी वेल्ह्यातील सहा गावात जाऊन मुक्काम केला व सायं. ५ ते ८ असे शिबिर घेतले. प्रत्येक गावात साधारण ४५ ते ७० मुला-मुलींची उपस्थिती होती. या शिबिरात जास्वंद वर्गातील युवतींनी स्थानिक संयोजन केले.

**युवती विकास :** शिवापूर व कोदवडी येथे (१२ व २१ जणी) मुलींसाठी कौशल्य प्रशिक्षण वर्ग चालू आहे. त्यातील चारजणी हराळीला एक दिवसाचा मेळावा घेण्यास गेल्या होत्या. असेच दोन वर्ग वेल्हे व घिसर येथे (२१ जणींसाठी) नव्याने सुरू झाले. त्यात प्रामुख्याने शिवण कौशल्य व व्यक्तिविकासाची सत्रे होणार आहेत.

सौर अग्रहायण २३ ते २७ रोजी पुण्यात भीमथडी जत्रेत आपल्या बचत गटांनी आपल्या मार्गदर्शनाखाली पण पूर्णतः स्वतंत्र असे दोन स्टॉल लावले व बचत गटातील महिलांच्या उत्पादनाची विक्री केली. गेल्या दोन महिन्यात स्वयंरोजगार उपक्रम म्हणून सहा ठिकाणी आपल्या मुली मेंदी काढायला गेल्या होत्या. त्यातून रु. १०,००० पेक्षा जास्त रकमेची उलाढाल झाली.

## मध्यवर्ती प्रबोधक प्रशिक्षण वर्ग - ११

सर्व केंद्रांवरील कार्यकर्ते व सदस्य यांचे प्रबोधक प्रशिक्षण शिबिर सौर अग्रहायण १२ ते १४ शके १९३३ रोजी निगडी केंद्रावर झाले. सरासरी ७० सदस्य या शिबिराला उपस्थित होते. शिबिरात मुख्य भर भवितव्य लेख या विषयावर होता व त्याबरोबर विविध सत्रे झाली.

पहिल्या दिवशी (सौर अग्रहायण १२) रोजी शिबिराची सुरुवात उपासनेनी झाली. पुढील सत्रात भवितव्य लेखाची संपादन पद्धती कशी असावी व कशी झाली याचा आढावा मा. संचालकांनी घेतला व क्रमशः शिवराजदादा-निगडी, प्रणिताताई - प्रज्ञा मानस संशोधिका, महेंद्रभाई - छात्र प्रबोधन यांनी त्यांच्या विभागात झालेली प्रक्रिया मांडली. दुपारच्या सत्रात पुस्तिकेचे वाचन झाले व नंतर प्रत्येक विभागाच्या नावाचे तक्ते बनवले गेले. त्यावर इतर विभागातील सदस्यांनी आवडलेले मुद्दे व आपले अभिप्राय लिहायचे होते. त्यानंतर त्यावर विभागशः गटचर्चा झाली. दलानंतर भविष्यवेध चित्रफिती (प्रणव मिस्त्री, नंदन निलकेणी) बघितल्या. एकूण तंत्रज्ञानाचा वाढता वापर व आपला विभाग अशी गटचर्चा नंतर त्यावर झाली. रात्री श्री. सोनवणे (अण्णांचे आंदोलन) व मा. उषाताईंचे अनुभव कथन झाले.

रविवार (सौर अग्रहायण १३) मा. गिरीशराव व मा. महेंद्रभाई यांचे अनौपचारिक व औपचारिक शिक्षण प्रणाली चे सत्र झाले. यानंतर नेतृत्वाचे पैलू (सादरीकरण व गटचर्चा) या विषयावर मा. महेंद्रभाई व मा. विवेक कुलकर्णी यांनी सत्र घेतले. या सत्रामध्ये व्यक्ती, कार्यकर्ता व नेता या तीन टप्प्यांवरील आवश्यक गुणांवर चर्चा झाली. दुपारी वा. अनघाताईंनी नाटिकांमधून युवा मानसिकता हा विषय मांडला. दल झाल्यावर हान्स रोसलिंग यांची चित्रफित पाहिली व त्याचा संदर्भ घेऊन गटशः चर्चा झाली. रात्री श्री. अनिरुद्ध करमरकर यांचे दल या विषयावर अनुभव कथन झाले.

सौर (अग्रहायण १४) रोजी पहिले सत्र मा. विवेकरावांनी १५-२५ वयोगटासाठी शिक्षणप्रणाली असे घेतले. पुढील सत्रात भवितव्य लेखाचे गटशः लेखन व पुढील सत्रात सादरीकरण झाले. शेवटी मा. संचालकांनी शिबिराचा समारोप केला.